Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2019

SPECIAL ISSUE- 82 (A)

# पटकथा लेखन : स्वरुप आणि चिकित्सा



अतिथी संपादक :
डॉ. इंद्रजित जाधव
प्राचार्य,
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

विशेषांक सहसंपादक :
प्रा. पोपट माने, डॉ. पुरुषोत्तम काळे

विशेषांक संपादक :
डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर
मराठी विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव, जि. पुणे

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019 Special Issue – 82 [A]

## पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा

अतिथी संपादक :
प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक संपादक :
डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर,
मराठी विभाग प्रमुख,
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे

विशेषांक सहसंपादक
प्रा. पोपट माने
डॉ. पुरुषोत्तम काळे

मुख्य संपादक : डॉ. धनराज धनगर

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 800/-

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A legendary Films and Film-Makers | Dr. Amina Khatun | 05 |
| 2 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | श्रीनिवास भणगे | 08 |
| 3 | चित्रपट सृष्टीला दृगोच्चर करणारी पटकथा | डॉ. तुकाराम रोंगटे | 13 |
| 4 | तमिळ चित्रपट : एक दृष्टीक्षेप | डॉ. ताहेर पठाण | 17 |
| 5 | कन्नड मराठी पटकथा आणि वास्तव | डॉ. श्रीपती रायमाने | 21 |
| 6 | पटकथा लेखन :एक परिचय | डॉ.प्रमोद भगवान पडवळ | 24 |
| 7 | ठाकर जीवनावरील पटकथा लेखन | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 31 |
| 8 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. भास्कर ढोके | 34 |
| 9 | चित्रपट माध्यम आणि आदिवासी सामाज वास्तव | डॉ. वैजनाथ अनमूलवाड | 40 |
| 10 | पटकथा लेखन प्रक्रिया | सुरेश मेहेर | 45 |
| 11 | कथा ते पटकथा | डॉ. सुनील खामगळ | 49 |
| 12 | ऐतिहासिक कादंबरी आणि पटकथा लेखन | प्रा.चांगुणा कदम | 57 |
| 13 | माहितीपटाची संकल्पना आणि स्वरूप | डॉ. महेबूब सय्यद | 59 |
| 14 | माहितीपट निर्मितीचे तांत्रिक स्वरूप | डॉ. नवनाथ येठेकर | 65 |
| 15 | पटकथा लेखनप्रक्रिया | डॉ. राजेंद्र खंदारे | 69 |
| 16 | साहित्य आणि चित्रपट | डॉ. अनिल बांगर | 73 |
| 17 | पटकथा लेखन स्वरूप | डॉ. वंदना नढे | 78 |
| 18 | भारतीय प्रागतिक चित्रपट विशेष संदर्भ : 'काला' | मदन जाधव | 80 |
| 19 | पटकथालेखन : संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रमोद धिवार | 83 |
| 20 | नाटक, पटकथा : शैली आणि तंत्र | प्रा. प्रमोद पवार | 87 |
| 21 | पटकथा लेखन आणि नाट्यलेखन | प्रा.विकास बहुले | 91 |
| 22 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. शुभांगी बारवकर | 96 |
| 23 | लघुपट,माहितीपट आणि चित्रपट (सिनेमा) पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा. अपूर्वा बेतकेकर | 98 |
| 24 | पटकथेतील व्यक्तीरेखाटन आणि संवाद स्वरूप विशेष | प्रा.अरविंद जाधव | 102 |
| 25 | पटकथा लेखन आणि नाट्य लेखन यातील साम्य-भेद | डॉ. एम. एम. बागुल | 106 |
| 26 | पटकथा लेखनाचे तंत्र | डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 27 | पटकथा लेखन प्रक्रिया | सायली जगताप | 113 |
| 28 | चित्रपट, लघुपट, माहितीपट | डॉ.उज्ज्वला भोर | 118 |
| 29 | पटकथा लेखन- एक कला | डॉ. केतकी भोसले | 122 |
| 30 | चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेमध्ये कॅमेऱ्याचे महत्त्व | डॉ.बाळासाहेब चव्हाण | 125 |
| 31 | पटकथा लेखनाचे तंत्र | प्रा.तुकाराम चव्हाण | 132 |
| 32 | पटकथा आणि इतर कला | प्रा.अमोगसिद्ध चेंडके | 135 |
| 33 | मराठी चित्रपटसृष्टीची वाटचाल | डॉ.नारायण चौरे | 138 |
| 34 | पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप | डॉ.मधुकर वैकरे | 144 |
| 35 | साहित्यकृती व पारितोषिक प्राप्त चित्रपट | डॉ.सौ.मंगल डोंगरे | 147 |
| 36 | बाल नायकप्रधान श्यामची आई ते नाळ व्हाया टिंग्या : पटकथा लेखन | डॉ.दत्तात्रय डुंबरे | 151 |

ISSN : 2348-714
January-2


| | | | |
|---|---|---|---|
| 37 | चित्रपट व इतर कला माध्यमे | मदन गहिरे | 155 |
| 38 | पटकथा लेखन- स्वरूप आणि चिकित्सा | प्रा.राहुल गायकवाड | 159 |
| 39 | पटकथा लेखन:संकल्पना आणि स्वरूप | डॉ. प्रताप गायकवाड | 162 |
| 40 | गौतम बुध्द चरित्र आणि पटकथा लेखन एक समीक्षा | डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर व श्री शिवाजी गायकवाड | 165 |
| 41 | समांतर चित्रपट आणि समाज | प्रा.नानासाहेब गव्हाणे | 171 |
| 42 | 'निशाणी डावा अंगठा' कादंबरी आणि चित्रपट : एक तुलना | प्रा.विजयकुमार घोडके व डॉ.राजेंद्र ठाकरे | 175 |
| 43 | पटकथा लेखन प्रक्रियेचे स्वरूप | बाबासाहेब जाधव | 179 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक व लेखक यांच्या लेखी पूर्व प शिवाय या लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. अंकातील लेखांमधून व्यक्त झालेली मते ही त्या संबंधित लेखकांची आहेत. त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वरूप जबाबदारी सर्वस्वी लेखकांची आहे.*



'RESEARCH J
Impa

Indian
Bombay the f
Phalke (the fat
talk about Indi
unfortunate tha
say ignored. B
center of India
(till 1911, the c
film "Dancing
Sen in 1898. I
folk culture an
popular culture
of 'jatra', theat
in 1919, under
has always bee
Mrinal Sen, G
cinemas.
Ritwik
who had left a
enough to desc
To a Bengali h
human emotion
depiction of so
cinema from li
master of story
emotional impa
Ritwik Ghatak
first Bengali art
an actor and as
Ghosh in 1951.
Madhumati, Su
"Meghe Dhaka
film world. A h
my view it is th
years before. Be
become a miles

ISSN : 2348-7143
January-2019

# पटकथालेखन आणि नाटयलेखन यातील साम्य भेद

डॉ.एम.एम. बागूल
अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय
ओतूर ता.जुन्नर,जि.पुणे
मो.नं.९८६०४१८९७०
E-Mail- mmbagul2012@gmail.com

आजचा युग विज्ञान तंत्रज्ञानाच्या संदर्भात इतके पुढे गेले असले तरी, संहितालेखन, पटकथालेखन, नाटयलेखन, मालिकालेखन, जाहिरातलेखन अशा मिडिया केंद्रीत लेखन आजकालचा तरूण या लिखानाकडे आकर्षित होत आहे. आपल्या प्रतिभा आणि कल्पनाशक्तीच्या जोरावर या व्यवसायाकडे ओढला जात आहे. कारण मालिका असो चित्रपट असो त्यासाठी लेखन करावेच लागते म्हणून पटकथा अगोदर लिहिली जाते व नंतर सादरीकरण केले जाते. चित्रपटाचा महत्वाचा कणा म्हणजे पटकथा होय. पटकथा लेखन आणि नाटयलेखन यांच्यामध्ये साम्य आहे. नाटयलेखन शब्दांनी तयार झालेले संवाद सादर करावयाची कला म्हणजे नाटकलेखन होय. किंवा एका मानवीसमुहाने दुस–या मानवीसमूहासमोर सादर करावयाची कला म्हणजे नाटक होय. चित्रपट हा जेव्हा स्क्रीनच्या फ्रेममध्ये दाखविला जातो तेव्हा वेगवेगळया लोकेशन नुसार आणि वेळेनुसार त्या कथेचे काही सीन दाखवितात. त्यामध्ये संवाद प्रत्येक व्यक्तीरेखाचे वेगळेपण, संघर्ष त्या संवादातून बोलणे लिहिले जाते. लेखक हा आपल्या विचारांची व कल्पनांची मांडणी करीत असतो. पटकथेतील संवाद लिहून झाल्यावर दिग्दर्शक हा लिहिलेल्या कथानक तपासून वेगवेगळया शॉटस तयार करून एकसारखी सलग वाटतील असे शॉट जोडले जातात. आणि शब्दातील कथा ही चित्रस्वरूपात अखंड तयार होते.

पटकथा लेखनाचे खरे स्वरूप म्हणजे दृक-श्राव्य माध्यमाने अनुकुल असते. चित्रपटाची कहाणी प्रभावी असावी लागते. चित्रपट निर्माण करण्याचा हेतू सार्थ करण्यासाठी श्रोतापर्यंत विचार व आशय पोचणे आवश्यक आहे. म्हणून कोणत्याही मूळ कथेच्या आधारवर चित्रपट तयार होऊ शकत नाही. कथेला दृश्य आणि माध्यमाद्वारे अभिव्यक्त करण्यासाठी पटकथा लिहिली जाते.

आजच्या युगात प्रसारमाध्यमांना समाजात महत्त्व आहे. माध्यमांना समाजजीवनाचा आरसा म्हणतात. म्हणजे माध्यम हे "मध्य" या शब्दापासून बनले असून दोन व्यक्ती, समाज, संस्कृती, शब्द यामधील विचारांची देवाण घेवाण होत असते. चित्रपटातून समाज प्रबोधन केले जाते. पूर्वी प्रसारमाध्यमे म्हणजे भारूड, गोंधळ, किर्तन, तमाशातील वग, बहुरूपी या घटकामध्ये सुध्दा एक प्रकारे कथाच होती. आज जनजागृतीचे काम चित्रपट व नाटक करीत आहेत. म्हणून पटकथा लेखकाला विविध सामाजिक चालीरिती, रूढी–परंपरा यांचा अनुभव असावा लागतो. एका कहाणी बरोबर दुस–या कहाणीशी कशी जुळवून घेता येईल यांची लेखकाला जाणीव असावी लावते. म्हणून पटकथा लिहिताना कधीकधी दिवसरात्र लिहित राहावं लागते किंवा एका बैठकीत बसावे लागते. कोणतीही कल्पना अचानक सुचत नाही त्यासाठी पार्श्वभूमी असावी लागते. तसेच भाषेवर प्रभूत्व असले पाहिजे.

पटकथा म्हणजे प्रोजेक्टची लेखी स्वरूपात मांडलेली तांत्रिक माहिती होय. दृक–श्राव्य माध्यमासाठी पटकथा लिहिली जाते सर्वात महत्तवाची गोष्ट म्हणजे लेखकाला चित्रपटाची थीम किंवा स्वरूप सांगितली जाते. ही थीम जर निर्माता दिग्दर्शक यांना पसंत पडली आणि त्यांना मान्य असेल तरच लेखकाला कथेची विस्तृत व

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

योग्य रूपरेषा तयार करण्यास सांगतो आणि पटकथा तयार होते. दुसरा प्रकार म्हणजे निर्माता दिग्दर्शक हे कथाकाराला कल्पना आणि थीम सांगतात. त्यानुसार लेखक आपली पटकथाची रूपरेषा तयार करतो व सर्वांची मान्यता मिळाल्यानंतर कलावंतांच्या पसंतीची मान्यता घेवून पटकथा लिहिली जाते. तिसरा प्रकार म्हणजे सर्वांची मान्यता मिळाल्यानंतर कथा सर्व कलावंतांना ऐकवून त्यांची पसंती घेतली जाते. त्यानंतर आवश्यकतेनुसार पथकथेमध्ये बदल केले जाते एक चित्रपट तयार करण्यासाठी एका चांगल्या कथेची आवश्यकता असते. पटकथेमुळे एखादा चित्रपट यशस्वी होतो तसेच चित्रपटमधील नायक, नायिका व दिग्दर्शक यांचे नावे यशस्वी होतात. परंतु पटकथा लेखकाचा नावलौकिक समाजात होत नाही.

चित्रपटासाठी पटकथा लखेनप्रक्रिया कथेच्या मूळ विचारापासून सुरू होते. लेखकाला दृश्य आणि संगीताचा समावेश करण्याची संधी मिळते. कथेसोबत कॅमेरा, ध्वनी, अभिनय इत्यादी गोष्टींची माहिती दिली जाते. पटकथेमध्ये कथेचा विकास हा साहित्याच्या विकासाप्रमाणेही असतो भारतीय चित्रपटाची कथा ही प्रेम, पैसा, संघर्ष, हरवले, सापडले, स्त्रियांच्या परंपरा, रूढी, देशप्रेम, ऐतिहासिक, पौराणिक, कौटुंबिक, नैसर्गिक, प्राणी, पशू, अवकाश, भूत इत्यादी विषय डोळया समोर ठेवू पटकथालेखन व नाटयलेखन लेखक वास्तववादी व काल्पनिक विचारातून पटकथाची मांडणी करीत असतो.

पटकथालेखन करीत असताना लेखकाजवळ शब्दभांडार असणे गरजेचे असते. दृश्य घटना आणि संवाद ही पटकथेची मुळ तत्त्व आहेत. निवड केलेला कथेला संपूर्ण घटना आणि संवादामध्ये बसवावे लागते. पटकथा दृश्य व श्राव्य माध्यम असल्यामुळे कॅमे–यातून चित्रित करून पटकथा लोकांसमोर मांडण्यात येते. काही पटकथा या कांदबरी नाटक, कथा, आत्मचित्र या साहित्यप्रकारातून कहाणी घेतल्या जातात. उदा. 'नटसम्राट' हे नाटकाचे चित्रपट निर्माण झाले आणि समाजात लोकप्रिय झाले. या नाटकातील कथानक 'नटसम्राट' या चित्रपटामध्ये जसेच्या तसा घातली. या चित्रपटामध्ये शोक, व्यथा, हालअपेष्टा, आपत्ती शोकनाटयाचा संबंध आला आहे. 'नटसम्राट' या चित्रपटाची पटकथामध्ये गणपतराव बेलवलकर उर्फ अप्पा या पात्राच्या जीवनावर हे चित्रपट आधारीत आहे. अप्पासाहेब हे नटसम्राट या शोकत्मिकेचे नाटक आहेत. आपले वय झाल्यांनतर आपली संपत्ती दोन मुलांच्या नावावर करून दयावी आणि आपण आनंदी जीवन जगावे असे वाटते. त्यानंतर आपली संपत्ती मुलगा व मुलगी यांच्या नावावर करून देतो काही दिवसांनी त्यांच्यामध्ये वादविवाद सुरू होतो. तरी सुध्दा आपल्या मुलांमध्ये आनंद शोधण्याचा प्रयत्न करतो. मुलांच्या घरी राहात असताना त्यांना अडचण भासू लागते. नवीन पिढी आणि जुनी पिढी यांच्यामध्ये विचारप्रणालीमध्ये ताण निर्माण होतो. अप्पासाहेब बेलवलकर यांच्यावर अनेक संकटे येतात. आपल्या स्वत:ची मुलगी आपल्या वडीलांवर पैशाची चोरी केल्याचा आळ घेते. याचा आप्पांना मानसिक धक्का बसतो.

पटकथेमध्ये प्रसंग व दृश्य ही लिहिली जाते. दृश्य –१, दृश्य–२, दृश्य–३, दृश्य–४ याचप्रमाणे ठिकाण आणि वेळ यांचाही उल्लेख करावा लागतो. यामुळे शुटिंगच्या वेळी अडचण निर्माण होत नाही. पटकथेमध्ये घटना दृश्य कथानकात क्रमवारी व व्यवस्थित असते. कोणत्या घटनेमध्ये कोणकोणती पात्रे आहेत. त्यांची भूमिका काय आहे? हे सर्व त्यांची सुची पटकथेच्या दृश्यावर लिहिली जाते. चित्रपट हा कोणत्या ना कोणत्या माहितीवर आधारीत असतो. त्या घटनेमध्ये सत्य सर्व प्रकारचे दृश्य सामग्री एकत्रपणे व एकाग्र शृंखलेने सलगपणे बांधली जाते. त्यानंतर पार्श्ववाचन करून त्यासंबंधी सर्व माहिती कॉमेंट्रीच्या स्वरूपात रेकॉर्डिंग करून आवाज चित्रपटात भरला जातो. अशा प्रकारे माहितीपूर्ण विषयावर निवेदनासह प्रदर्शित केला जाणारा चित्रपट निर्माण होत असतो.

ISSN : 2348-7143
January-2019

नाटयलेखन – 'नाटक' हे जीवनाचे अनुकरण आहे. चालीरितींचा आरसा आहे. सत्याचे प्रतिबिंब आहे. 'अशी व्याख्या सिसिरो या ग्रीक विचारवंताने केली आहे. नाटक एक वाङ्‌मय प्रकार आहे. नाटकात जास्तीत जास्त वास्तव जीवनाचे दर्शन घडते. 'नाटक' हे निसर्गाचे अनुकरण नसून त्याची नक्कल आहे. ही व्याख्या कोलरिज यांनी केली. तर विल्यम अर्थर यांनी 'नाटक' हे आपल्याला कमीपणा आणणा–या व बंधन घालणा–या दैवी शक्ती व निसर्ग यांच्या संघर्षात सापडलेला कमीपणा आणणा–या व बंधन घालणा–या दैवी शक्ती व निसर्ग यांच्या संघर्षात सापडलेल्या माणसाच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करते असे म्हटले आहे. नाटक सादर करावयाची कला आहे. नाटक वाचण्यापेक्षा पाहाण्यात आनंद जास्त मिळतो. नाटक वाङ्‌मय प्रकार प्रयोगशील वाङ्‌मय प्रकार आहे. रंग भूमीवर विविध व्यक्तिरेखांच्या अभिनयातून किंवा हावभावातून पेक्षकांसमोर नाटकाचे प्रयोग होणे गरजेचे असते. नाटक हे नाटकच असते मग ते संघाचे नाटक असो, चित्रपटातील नाटक असो, दूरदर्शनवरील किंवा रंगमंचावरील नाटक असो त्याला नाटकच म्हटले जाते. नाटक एकच असतो. पण विविध प्रसारमाध्यमांच्या प्रसारणातील त्यांच्या आवश्यकतेनुसार आपण भेद करतो. नाटक हे साहित्याचे प्रमुख अंग आहे. दूरदर्शनवरील नाटक हे रंगमंचावरील सारखेच असतो. नाटक हे दृश्य व श्राव्य माध्यम आहे. त्यामध्ये पाहणे व ऐकणे या दोन गोष्टीचा उपयोग होतो. आज नाटक टी.व्ही. चित्रपट या माध्यमातून दाखविले जातात. चित्रपटाचा पडदा मोठा असल्यामुळे मोठया प्रसंगातून आशय व अर्थ प्रेक्षकांपर्यंत चांगल्या पध्दतीने पोहचविता येते. रंगमंचावरील नाटक व चित्रपटातील नाटक यामध्ये फरक आहे. रंगमंचीय नाटक प्रेक्षकांना जिवंत अनुभव देत असतो.

नाटक आणि चित्रपट यामधील संवादाला महत्व असते. नाटकाचे शरीर संवादाचे असते. आणि संवाद रंगमंचावर नाटकातील पात्रे बोलून दाखवितात, जेव्हा पात्र आपआपसात बोलतात तेव्हा चर्चा सुरू होते यालाच संवाद असे म्हणतात. आशयात्मक दृष्टिने मराठी रंगभूमी जीवनातल्या वास्तवाचे चित्रण करते. उदा.देवलांच्या 'संगीत शारदा' व मा.फुले यांचे 'तृतीय रत्न' या नाटकापासून सुरू झाली. नाटक आणि चित्रपट यांची कहाणी घटनावर आधारीत आहे. एखादी कथा ही नाटक, मालिका व चित्रपट यांची कथानक सारखीच असली तरी, दोन ही गाजतात हीच तर पटकथेचे वेगळेपण आहे. नाटक हे एका ठिकाणी निर्माण होतो तर चित्रपट आणि मालिका यांची निर्मिती विविध ठिकाणी शॉटस् घेतले जातात. चित्रपटामध्ये वैचारिक चर्चाला फारसे महत्व नसते. नाटकामध्ये गंभीर वातावरण रूपधारण होत असते. तर चित्रपटाचे वातावरण काही माध्यमाच्या द्वारे करावी लागते. नाटकामध्ये मानवी कलेचे योगदान अधिक आहे. नाटकातील कथानक हे सत्य वाटते, तर चित्रपटातील कथानक हे कृत्रिम वाटते. नाटकातील पात्र रंगमंचवर प्रत्यक्ष कला सादर करीत असतात. नाटकाचा प्रयोग सुरू झाले की, पुर्ण झाल्याशिवाय बंद होत नाही. चित्रपट हे दृश्य–श्राव्य माध्यम असल्यामुळे एका ठिकाणी छायाचित्रण होत नाही. त्यामुळे चित्रपट निर्मीतीस वेळ आणि जास्त पैसा लागत असतो. रंगमंचावर नाटक चूक भूल सुधारण्यास वेळ नसतो तर चित्रपटामध्ये चूक झाल्यास ती सुधारण्यास वेळ असतो. नाटक आणि चित्रपट यांची 'पटकथा' एकच असली तरी कहाणीमध्ये विभिन्न दृष्टिकोन असतो. नाटयलेखनात विषयसुत्र, संविधानक, पात्रचित्रण, संवाद, रंगसुचन, भाषा आणि वातावरणनिर्मिती हे महत्त्वाचे घटक आहेत. कारण की चित्रपटातील दृश्य–श्राव्य माध्यमाची पटकथा लिहिताना फारशी अडचण येत नाही आणि कोणत्याही ठिकाणी शॉटस् घेऊ शकतो. तसे नाटकाची पटकथा एका खोलीत बसून नाटककार लिहित असतो त्याला घराबाहेर वातावरण दिसत नाही. म्हणून कहाणी एक असली तरी स्वरूप अलग अलग आहे. पटकथाकार हा हुशार व बहुश्रुत असावा.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 82 (A) : पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

त्याला अनेक कलांची पारख असली पाहिजे. इतिहास, भुगोल, सामान्यज्ञान, सभोवतालची परिस्थिती व जीवनविषयक दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे. हे गुण पटकथाकाराजवळ असले पाहिजे.

पटकथालखेन आणि नाटयलेखनातील विशेष

१. दृश्यचे वर्णन करणे म्हणजे पटकथा होय.
२. चित्रपटातील घटनांना महत्त्व असते.
३. कथावर्णनात मानव व समाजाला महत्त्व असते.
४. एखादया साहित्यकृतीतून चित्रपट तयार करावयाचे असले तर लेखकाची सहमती घ्यावी लागते.
५. एखादी पटकथा काल्पनिक असली तरी संतुलीत असणे गरजेचे आहे.
६. नाटक पटकथामध्ये वैचारिक विचाराला महत्त्व असते.
७. नाटक हे मानवसाध्य आहे.
८. नाटकपटकथा व चित्रपटकथा यांच्यामध्ये साम्य आहे.
९. चित्रपट पटकथा ही दृश्य व श्राव्य माध्यम आहे.
१०.पटकथाची भाषा साधी व सोपी असावी सामान्याला ही समजेल अशी असावी.
११.आज इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमात मिश्र भाषेचा वापर सर्रास केला जातो.

समारोप:

पटकथा लेखन व नाटयलेखन यामध्ये परस्पर संबंध आहे. दूरदर्शन, रेडिओ आणि रंगमंचीय नाटक, जाहिरात, मालिका यासाठी अगोदर लेखन करावे लागते. प्रत्येकाचे लेखन स्वरूप हे अलग आहे. या सगळयाच माध्यमांमध्ये संवाद हा भाग महत्त्वाचा असतो. कोणत्याही कथेवर पटकथेचे लेखन पुर्ण झाल्यावर त्याच्यातील दोष व कमतरता बघून त्यामध्ये वाटल्यास परीवर्तन केले जाते. आणि म्हणून कथेतील संवाद पध्दती श्रोत्यांना खिळवून ठेवते, तीच खरी पटकथा चांगली असते. आज प्रेक्षकांची आवड नाटक पाहण्यापेक्षा चित्रपट पाहण्याकडे जास्त कल दिसतो. दूरदर्शन, टि. व्ही यासारख्या प्रसारमाध्यमे ग्रामीण भागापर्यंत जावून पोहचली आहेत. त्यामुळे घरी बसून चित्रपट पाहता येतात. परंतू नाटयगृह हे फक्त शहरी भागात असल्यामुळे ग्रामीण प्रेक्षकांना नाटक पाहता येत नाही म्हणून नाटक ग्रामीण भागातील लोकांपासून दूर राहिले. वि.वा.शिरवाडकरांचे नाटक 'नटसम्राट' हे नाटकांपेक्षा चित्रपट म्हणून समाजात जास्त लोकप्रिये झाले आहे. जरी पटकथा एक असली तरी स्वरूप मात्र अलग अलग आहे.

संदर्भ ग्रंथ –

१. उपयोजित मराठी, प्रा.डॉ.संजय संभाजी लांडगे, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे.
२. पटकथा कैसे लिखे, राजेंद्र पांडे, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली – ११०००२.
३. वाङ्मयप्रकार (काव्य व नाटक), यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
४. इलेक्टॉनिक माध्यम बनाम मुद्रीत माध्यम, संपादक– राजकुमारी गडकर, अन्नपूर्णा प्रकाशन कानपूर.